503

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व.का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक १५/०१/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,गृह विभाग, निर्णय क्र. न्यायप्र ०५२३ / सी-७६ / पोल-९, दि. १४/०१/२०२५.

**विषय :-** शस्त्र कायद्याची अंमलबजावणी व अवैध शस्त्रांच्या गैरवापरावर प्रतिबंध घालण्याकरिता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. न्यायप्र ०५२३ / सी - ७६ / पोल-९, दि. १४/०१/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०११४१७४५४६८९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / नि.व स. / रा.रा.पो.बल ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई / लोहमार्ग वगळून).
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, परिक्षेत्र पुणे व नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का क्र.१७-अ / का.क्र.२४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

शस्त्र कायद्याची अंमलबजावणी व अवैध शस्त्रांच्या गैरवापरावर प्रतिबंध घालण्याकरिता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

## शासन निर्णय क्रमांकः न्यायप्र ०५२३/सी-७६/पोल-९

२ रा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
तारीख: १४ जानेवारी, २०२५

**वाचा :-** विशेष अनुमती याचिका (क्रिमीनल) क्र. १२८३१/२०२२ च्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश दि. ०७ नोव्हेंबर, २०२४.

**प्रस्तावना :-**

श्री. राजेंद्र सिंग यांनी अवैध शस्त्राचा होत असलेल्या गैरवापराबाबत भारत सरकार व इतर राज्य सरकार यांच्या विरूध्द मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका (क्रिमीनल) क्र. १२८३१/२०२२ दाखल केली आहे. सदर विशेष अनुमती याचिकेच्या अनुषंगाने दि. ०७ नोव्हेंबर, २०२४ रोजी झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने शस्त्र कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व विनापरवाना शस्त्रांच्या गैरवापरावर प्रतिबंध घालण्याकरिता प्रत्येक राज्याने राज्यस्तरावर कृती आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्याकरिता मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याचे आदेश दिले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

प्रस्तावनेत नमूद बाबीस अनुसरून शस्त्र कायद्याची अंमलबजावणी व अवैध शस्त्रांच्या गैरवापरावर प्रतिबंध घालण्याकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) | मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २) | अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ३) | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ४) | प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५) | मुख्य सचिवांद्वारे नामनिर्देशित केले जाणारे बॅलिस्टिक्स क्षेत्रातील एक तज्ञ | सदस्य |

२. समितीची कार्यकक्षा :- उपरोक्त गठित केलेली पाच सदस्यीय समिती खालील कामांचा कृती आराखडा तयार करुन विहित कालावधीत मा. न्यायालयास सादर करेल:-

१) शस्त्र कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि शस्त्राचा विनापरवाना होत असलेल्या बेकायदेशीर शस्त्रांच्या वापरावर प्रतिबंध घालण्याकरिता कृती आराखडा तयार करणे.

२) सद्यस्थितीत शस्त्र व दारूगोळा उत्पादन व खरेदी -विक्री परवाना असलेले परवानाधारक तसेच शस्त्र व दारूगोळा उत्पादन व खरेदी-विक्री परवाना नसलेले कारखाने/कार्यशाळा जे शस्त्र आणि दारूगोळा हाताळतात यांची संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत तपासणी आणि लेखापरिक्षण करणे.

Scanned with CamScanner

३) राज्यातील अवैध शस्त्र आणि दारूगोळा निर्मिती, विक्री, वाहतूक यासंबंधीची माहिती एकत्रितरित्या जतन करणे.

४) राज्यातील अवैध शस्त्र व दारूगोळ्याची तस्करी रोखण्यासाठी नियमानुसार उचित कार्यवाही करणे.

५) समाजाविरुद्ध आणि राज्यांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये अवैध शस्त्र आणि दारूगोळा यांचा होणारा गैरवापर रोखण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा अभ्यास करणे.

६) समितीला न्याय्य आणि योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही पैलूचा सखोल अभ्यास करणे.

३. समितीची बैठक:- उपरोक्त समितीची वर्षातून किमान एक बैठक आयोजित करण्यात यावी. तसेच, अध्यक्षांच्या परवानगीने आवश्यकतेनुसार बैठकीचे आयोजन करण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०११४१७४५४६८९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

HEMANT ANANT MAHAJAN

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4146B85AAA58555E80C9D75A2ABA23B993E46DF208B0B469F1B74670DC22D7FA, cn=HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2025.01.15 13:10:32 +05'30'

(हेमंत महाजन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (गृह), यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (विशेष), यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्ग वगळून)
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, परिक्षेत्र पुणे.
१२. सर्व जिल्हादंडाधिकारी (बृहन्मुंबई व उपनगर वगळून)
१३. पोलीस अधीक्षक, जिल्हा पोलीस बल (सर्व)
१४. उप सचिव (पोल-९), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. निवडनस्ती (पोल-९).



Scanned with CamScanner